जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478


पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३९१ दिनांक - २६/०५/२०२३**

**सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**आंतरराजीय विमा पॉलीसी फ्रॉड करणा-या सराईत आरोपीस अटक**

पुण्यातील नामांकित डॉक्टर यांची पॉलीसी देण्याच्या बहाण्याने २०१३ पासुन ते आजपोवतो वेगवेगळया मेलआयडी व कॉलिंगसाठी मोबाईल नंबरचा वापर करुन वेगवेगळया १८ बँकेचे ४१ बँक अकाउंटस चा वापर करून तक्रारदार यांना पॉलिसीचे पैसे परत करुन देतो असे खोटे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांना वांरवार वेगवेगळया बँक अकाउंटवर पैसे भरायला सा्ंगुन त्यांची एकुण २,०१,५०,३५३/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी कायदेशीर तक्रार दिल्याने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ५१/२०२१, भा.द.वि.कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ सी, ६६डी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमूद अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीच्या गुन्हयाचे तपासामध्ये गुन्ह्यात वापरलेले बँक अकाऊंट डिटेल्स, मोबाईल नंबर, वॉट्सअॅप नंबर या साधनांचा संबंधीत कंपन्याकडून प्राप्त माहितीचे तांत्रिक विश्लेषन करुन नमुद गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी **बबलु पुत्र श्री बिन्देश्वर पासवान, वय -३७ वर्षे, रा. म.न. ९२, विनयनगर कॉलनी,सेक्टर -९१, फरिदाबाद, हरियाणा** यास सायबर पोलीस स्टेशन, आग्रा (उत्तरप्रदेश) येथील दाखल गुरनं- १७/२०२२, भा.द.वि.कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी) यात अटक असल्याची माहिती मिळाल्याने त्यास मा. न्यायालयाचे प्रोडक्शन वॉरंट नुसार ताब्यात घेऊन सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे आणून त्यास दि. २५/०५/२०२३ अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये याआधी १) संदिप कुमार पुत्र धर्मपाल, रा. लक्ष्मीनगर गार्डन, लोणी, गाझियाबाद २) साहीब खान पुत्र श्री नसीर अली, रा. गाव- पिढौना, कासगंज ३) तुआजिब खॉन पुत्र श्री अकिल अहमद, रा. विढौणा, कासगंज ४) शहवान पुत्र श्री सलिम अहमद, रा. एफ-७८, टप फ्लर, गल्ली नंबर -१०, वेस्ट्, जवाहर पार्क, लक्ष्मीनगर, दिल्ली - ११००९२ यांना अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री. रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त श्री संदिप कर्णिक मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्रीनिवास घाडगे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.विजयकुमार पळसुले, व.पो.नि. मिनल सुपे-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पो.नि. चंद्रशेखर सावंत, पोलीस अंमलदार प्रविणसिंह रजपूत, वैभव माने, राजुदास चव्हाण व किरण जमदाडे या पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली. **अशा प्रकारे विमा पॉलीसीचे बहाणा करुन फसवणूक करणारे गुन्हेगारांपासुन सावध राहण्याबाबत सायबर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर, पुणे यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे.**